**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2026 = 8.727
https://www.srjis.com/issues_data/290
Peer Reviewed & Refereed Journal, MAR-APRIL 2026, Vol- 14/94

# हंगामी स्थलांतराचा स्थलांतरित कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक सातत्यावर परिणाम

**संशोधक सुप्रिया सतीश पायरे**
**मार्गदर्शक डॉ. ज्योती बावने**
केंद्र: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन कोथरूड, पुणे.(IIE)
**Paper Received On:** 20 MAR 2026
**Peer Reviewed On:** 24 APRIL 2026
**Published On:** 01 MAY 2026

## सारांश

हंगामी स्थलांतर ही भारतातील सामाजिक, आर्थिक आणि रोजगाराशी संबंधित महत्त्वाची घटना आहे. रोजगाराच्या उपलब्धतेनुसार कुटुंबांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी काही महिन्यांसाठी स्थलांतर होते. बांधकाम, वीटभट्टी, ऊसतोड, शेती, रस्ते बांधकाम, औद्योगिक व असंघटित क्षेत्रातील कामगारांमध्ये हंगामी स्थलांतराचे प्रमाण अधिक आढळते. या स्थलांतराचा सर्वाधिक परिणाम कुटुंबातील शालेय वयातील मुलांच्या शिक्षणावर होतो. वारंवार शाळा बदलणे, शैक्षणिक वर्षामध्ये खंड पडणे, भाषिक अडचणी, अभ्यासक्रमातील तफावत, शैक्षणिक साधनांची कमतरता, पालकांची आर्थिक अस्थिरता, शाळेशी संपर्क तुटणे आणि काही वेळा बालमजुरी किंवा घरगुती जबाबदाऱ्या यांमुळे मुलांच्या शैक्षणिक सातत्यावर प्रतिकूल परिणाम होतो.
प्रस्तुत लेखामध्ये हंगामी स्थलांतरामुळे स्थलांतरित कुटुंबातील मुलांच्या प्रवेश, उपस्थिती, शाळेत टिकून राहणे, अध्ययन सातत्य, शैक्षणिक प्रगती आणि शाळा सोडण्याच्या प्रवृत्तीवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच कुटुंब, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासन या प्रमुख भागधारकांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. लेखामध्ये स्थलांतरित मुलांसाठी सातत्यपूर्ण, लवचिक आणि समावेशक शिक्षणव्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

***सूचक शब्द:*** *हंगामी स्थलांतर, स्थलांतरित कुटुंब, शैक्षणिक सातत्य, शाळा उपस्थिती, शाळा गळती, स्थलांतरित मुले, शैक्षणिक सहभाग, भागधारक*

## 1. प्रस्तावना (Introduction)

भारतामध्ये आर्थिक संधींचे असमान वितरण, ग्रामीण भागातील रोजगाराच्या मर्यादित संधी, नैसर्गिक परिस्थिती, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि विकासकामांमुळे मोठ्या प्रमाणावर अंतर्गत स्थलांतर घडून येते. स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांमध्ये अनेकदा पालकांसोबत शालेय

*Copyright © 2026, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

वयातील मुलेही स्थलांतरित होतात. परिणामी मुलांच्या शिक्षणात सातत्य राखणे हे गंभीर आव्हान बनते.

हंगामी स्थलांतराचे वैशिष्ट्य म्हणजे स्थलांतर हे कायमस्वरूपी नसून विशिष्ट रोजगाराच्या कालावधीशी संबंधित असते. कामाचा कालावधी संपल्यानंतर कुटुंब पुन्हा मूळ गावी परतते. त्यामुळे एका शैक्षणिक वर्षात मुलांना दोन किंवा अधिक शैक्षणिक वातावरणांचा सामना करावा लागू शकतो. काही मुलांचे शिक्षण एका शाळेत सुरू होऊन दुसऱ्या ठिकाणी खंडित होते आणि पुन्हा मूळ गावी परतल्यानंतर त्यांना पूर्वीच्या शाळेत समायोजित होणे कठीण जाते. शैक्षणिक सातत्य म्हणजे केवळ शाळेत प्रवेश घेणे नव्हे; तर नियमित उपस्थिती, अध्ययन प्रक्रियेत सहभाग, अभ्यासक्रम पूर्ण करणे, शैक्षणिक प्रगती करणे आणि शिक्षणाच्या पुढील स्तरावर संक्रमण करणे होय. त्यामुळे हंगामी स्थलांतर आणि शैक्षणिक सातत्य यांचा परस्परसंबंध अभ्यासणे शैक्षणिक संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते

**2 संशोधनाची गरज महत्त्व**

हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांच्या मुलांच्या शिक्षणातील समस्या या केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक समस्या नसून सामाजिक आणि शैक्षणिक समतेशी संबंधित आहेत.

या अभ्यासाचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे:

स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणात निर्माण होणाऱ्या खंडाचे स्वरूप स्पष्ट होते.

शाळा बदलल्यामुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक संक्रमणाच्या समस्या समजतात.

मुलांच्या नियमित उपस्थितीवर परिणाम करणारे घटक ओळखता येतात.

पालकांच्या आर्थिक परिस्थितीचा शैक्षणिक सातत्याशी असलेला संबंध स्पष्ट करता येतो.

स्थलांतरित मुलांच्या शैक्षणिक गरजांसाठी शिक्षकांना योग्य नियोजन करता येते. शाळा प्रशासनाला स्थलांतरित मुलांसाठी विशेष शैक्षणिक व्यवस्था विकसित करता येते.

शासनाच्या स्थलांतरित बालकांसंबंधी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दिशा मिळते.

शैक्षणिक गळती कमी करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना सुचविता येतात .

**3 उद्दिष्टे (Objectives)**

१ )हंगामी स्थलांतराची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करणे.

२)हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

३)स्थलांतरामुळे मुलांच्या शाळेतील उपस्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

४)वारंवार शाळा बदलण्याचा मुलांच्या शैक्षणिक सातत्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**4 संशोधन प्रश्न**

१ )हंगामी स्थलांतरामुळे मुलांच्या शैक्षणिक सातत्यावर कोणत्या प्रकारचा परिणाम होतो?

२)स्थलांतरामुळे मुलांच्या शाळेतील उपस्थितीत कोणते बदल होतात?

३)वारंवार शाळा बदलल्यामुळे मुलांच्या अध्ययन प्रगतीवर परिणाम होतो का?

**5 समस्या विधान** : "हंगामी स्थलांतराचा स्थलांतरित कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक सातत्यावर परिणाम : एक विश्लेषणात्मक अभ्यास."

**6 कार्यात्मक व्याख्या**

**हंगामी स्थलांतर:**रोजगार किंवा उपजीविकेच्या उपलब्धतेनुसारनवी मुंबई येथील कुटुंबाने ठरावीक कालावधीसाठी एका भौगोलिक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केलेले तात्पुरते स्थलांतर.

**स्थलांतरित कुटुंब:**रोजगार, आर्थिक, सामाजिक किंवा इतर कारणांमुळे आपल्या मूळ निवासस्थानापासून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करणारे कुटुंब.

**शैक्षणिक सातत्य:**विद्यार्थ्याने नियमितपणे शाळेत उपस्थित राहणे, अध्ययन प्रक्रियेत सहभागी होणे, अभ्यासक्रमाशी जोडलेले राहणे, शैक्षणिक प्रगती करणे आणि शिक्षण पूर्ण करण्याच्या दिशेने सातत्याने

**7 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा** महाराष्ट्र राज्यातील हंगामी स्थलांतरित कुटुंबामधील मुलांचे शिक्षण ही या संशोधनाची व्याप्ती आहे. हे संशोधन नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हंगामी स्थलांतरित कुटुंबासाठी आहे .

**8 जनसंख्या:** प्रस्तुत लेखासाठी हंगामी स्थलांतरित कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी ५० शिक्षकांची सहेतुक पद्धतीने निवड करण्यात आली.

**9 संशोधनाची कार्यपद्धती** प्रस्तुत संशोधन वर्तमान काळातील असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धती ही मुख्य पद्धती आणि त्यातील सर्वेक्षणी उपपद्धती वापरली आहे तसेच हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांचे शिक्षणातील प्रश्न जाणून घेण्यासाठी त्यांच्या शिक्षकांचे प्रश्नावली द्वारे माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

**10 संशोधनाचे विश्लेषण**

**1 तुमच्या वर्गात हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुले आहेत का?**

| **तपशील** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | 42 | 84 |
| नाही | 8 | 16 |

**विश्लेषण**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, 84% शिक्षकांनी त्यांच्या वर्गात हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुले असल्याचे सांगितले आहे, तर केवळ 16% शिक्षकांच्या वर्गात अशी मुले नसल्याचे दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, अभ्यासातील बहुतांश वर्गांमध्ये हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांचा समावेश आहे. त्यामुळे हंगामी स्थलांतर ही शाळेच्या दैनंदिन शैक्षणिक

प्रक्रियेशी संबंधित महत्त्वाची बाब आहे. अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा, उपस्थिती, अध्ययनातील सातत्य आणि शाळेशी जोडलेले राहणे याकडे शिक्षक व शाळा प्रशासनाने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**अर्थनिर्वचन :** 84% हे प्रमाण तुलनेने मोठे असल्यामुळे हंगामी स्थलांतराचा प्रश्न मर्यादित स्वरूपाचा नसून अभ्यासातील शाळांमध्ये लक्षणीय प्रमाणात आढळणारी घटना असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे स्थलांतरित मुलांच्या शैक्षणिक सातत्यासाठी शाळास्तरावर विशेष नियोजनाची आवश्यकता अधोरेखित होते

**2 तुमच्या वर्गात हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांचे प्रमाण किती आहे?**

| तपशील | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 0 ते 5% | 10 | 20% |
| 6%ते 10% | 15% | 30% |
| 11% ते 15% | 15 % | 30% |
| 15%ते 20% | 10% | 20% |

**विश्लेषण**

वरील तक्त्याचे निरीक्षण करता, 30% शिक्षकांच्या वर्गात हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांचे प्रमाण 6% ते 10% आहे, तर 30% शिक्षकांच्या वर्गात हे प्रमाण 11% ते 15% आहे. अशा प्रकारे एकूण 60% वर्गांमध्ये हंगामी स्थलांतरित मुलांचे प्रमाण 6% ते 15% दरम्यान आहे.

याशिवाय 20% वर्गांमध्ये हे प्रमाण 0 ते 5% असून, आणखी 20% वर्गांमध्ये ते 15% ते 20% आहे.

अर्थनिर्वचन

या निष्कर्षावरून असे म्हणता येते की, बहुतांश वर्गांमध्ये हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांची उपस्थिती 6% ते 15% या प्रमाणात आहे. विशेषतः 11% ते 15% या गटाचे प्रमाण 30% असल्याने काही वर्गांमध्ये स्थलांतरित विद्यार्थ्यांची संख्या शैक्षणिक नियोजनाच्या दृष्टीने लक्षणीय आहे.

**3 ) तुमच्या वर्गातील हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांची शैक्षणिक स्थिती कशी आहे ?**

| तपशील | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| गृहपाठ वेळेवर करत नाहीत | 10 | 20% |
| अभ्यासात सातत्य राहत नाही | 15 | 30% |
| अभ्यासाची आवड राहत नाही | 10 | 20% |
| अभ्यासात मागे राहतात | 15 | 30% |

**विश्लेषण**

वरील तक्त्यावरून हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक स्थितीमध्ये काही महत्त्वाच्या अडचणी दिसून येतात.

सर्वाधिक 30% शिक्षकांनी मुलांच्या अभ्यासात सातत्य राहत नसल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे 30% शिक्षकांनी ही मुले अभ्यासात मागे राहत असल्याचे सांगितले आहे. म्हणजेच एकत्रितपणे 60% प्रतिसादांमध्ये अध्ययनातील सातत्याचा अभाव किंवा शैक्षणिक मागासलेपणा ही प्रमुख समस्या असल्याचे दिसून येते.

तसेच 20% शिक्षकांनी मुलांकडून गृहपाठ वेळेवर केला जात नसल्याचे आणि 20% शिक्षकांनी मुलांना अभ्यासाची आवड राहत नसल्याचे नमूद केले आहे.

**अर्थनिर्वचन:** वरील निष्कर्षांवरून असे दिसून येते की, हंगामी स्थलांतराचा मुलांच्या अध्ययनातील सातत्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः 30% मुलांमध्ये अभ्यासाचे सातत्य राहत नसणे आणि 30% मुलांचा अभ्यासात मागे राहणे या बाबी शैक्षणिक सातत्याच्या दृष्टीने गंभीर आहेत.

हंगामी स्थलांतरामुळे मुलांना वारंवार शाळा किंवा निवासस्थान बदलावे लागल्यास त्यांच्या अध्ययन प्रक्रियेत खंड पडू शकतो. परिणामी शिकविलेला अभ्यासक्रम पूर्ण न होणे, गृहपाठ अपूर्ण राहणे, मागील ज्ञानाशी नवीन ज्ञानाची सांगड न घालता येणे आणि अध्ययनातील तफावत निर्माण होणे अशा समस्या उद्‌भवू शकतात.

**माहिती संकलनाची साधने** :शिक्षक प्रश्नावली.

**संख्या शास्त्रीय साधने व तंत्रे:** शेकडेवारी सरासरी आलेख व कोष्टकीकरण.

**11 शैक्षणिक सातत्यावर परिणाम करणारे प्रमुख घटक**

**वारंवार शाळा बदलणे**

हंगामी स्थलांतरामुळे मुलांना वारंवार शाळा बदलावी लागू शकते. नवीन शाळेतील अभ्यासक्रम, अध्यापनपद्धती, पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक वातावरण वेगळे असल्याने मुलांना समायोजनाची समस्या निर्माण होऊ शकते.

**शैक्षणिक वर्षामध्ये खंड**

जर स्थलांतर शैक्षणिक वर्षाच्या मध्यात झाले, तर मुलांचे नियमित अध्ययन थांबू शकते. परिणामी अभ्यासक्रम अपूर्ण राहण्याची शक्यता असते.

**अनियमित उपस्थिती**

कुटुंबासोबत स्थलांतर करणाऱ्या मुलांना कामाच्या ठिकाणी शाळेची सुविधा उपलब्ध नसल्यास

**भाषिक अडथळे**

एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर झाल्यास शिक्षणाची भाषा बदलू शकते. त्यामुळे मुलांना शिक्षकांशी संवाद, पाठ्यपुस्तक समजणे आणि वर्गातील सहभाग यामध्ये अडचणी येऊ शकतात.

**आर्थिक परिस्थिती**

कुटुंबाच्या उत्पन्नाची अनिश्चितता, शैक्षणिक साहित्याचा खर्च आणि स्थलांतराचा खर्च यामुळे शिक्षणाला दुय्यम प्राधान्य मिळण्याची शक्यता असते.

**हंगामी स्थलांतर आणि शैक्षणिक सातत्य : कारण-परिणाम संबंध**

**हंगामी स्थलांतर**

↓

**निवासस्थानात बदल**

↓

**शाळा बदलणे**

↓

**अभ्यासक्रमातील तफावत**

↓

**उपस्थितीत खंड**

↓

**अध्ययनातील मागे राहणे**

↓

**शैक्षणिक सहभाग कमी होणे**

↓

**शाळा गळतीचा धोका**

↓

**शैक्षणिक सातत्यावर प्रतिकूल परिणाम**

**उपायोजना**

**1)** पोर्टेबल शैक्षणिक नोंद

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती स्थलांतराच्या ठिकाणानुसार उपलब्ध राहणे आवश्यक आहे.

2) सेतू वर्ग Bridge Course

नवीन शाळेत दाखल झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील तफावत भरून काढण्यासाठी पूरक अध्यापन आवश्यक आहे.

3)स्थलांतरित विद्यार्थ्यांसाठी विशेष समन्वयक

शाळा व कुटुंब यांच्यात समन्वय साधण्यासाठी विशेष जबाबदारी निश्चित करता येईल.

4) डिजिटल शिक्षण

स्थलांतराच्या काळातही विद्यार्थ्यांना अध्ययन सामग्री उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर करता येईल.पालक जनजागृती

5)"स्थलांतर झाले तरी शिक्षण खंडित होऊ नये" याबाबत पालकांचे प्रबोधन आवश्यक आहे.

शाळांमध्ये समावेशक वातावरण

6)स्थलांतरित विद्यार्थ्यांना "वेगळे" न समजता त्यांना समान शैक्षणिक संधी देणे आवश्यक

**मुख्य निष्कर्ष: (स्त्रोत प्रत्यक्ष नमुना पाहणी)**

हंगामी स्थलांतर ही केवळ आर्थिक किंवा रोजगाराशी संबंधित प्रक्रिया नसून तिचे सामाजिक आणि शैक्षणिक परिणामही महत्त्वपूर्ण आहेत. स्थलांतरित कुटुंबातील मुलांच्या शिक्षणामध्ये सातत्य राखणे हे या कुटुंबांसमोरील प्रमुख आव्हान आहे. वारंवार शाळा बदलणे, शैक्षणिक वर्षामध्ये खंड, अनियमित उपस्थिती, भाषिक अडथळे, अभ्यासक्रमातील तफावत, आर्थिक अस्थिरता आणि सामाजिक समायोजनाच्या समस्या यांचा मुलांच्या शैक्षणिक सहभागावर परिणाम होऊ शकतो.

मात्र स्थलांतर हे स्वतःमध्ये शिक्षणातील अपयशाचे कारण नसून स्थलांतराच्या प्रक्रियेदरम्यान

मात्र स्थलांतर हे स्वतःमध्ये शिक्षणातील अपयशाचे कारण नसून स्थलांतराच्या प्रक्रियेदरम्यान उपलब्ध असलेली शैक्षणिक व सामाजिक आधारव्यवस्था हा निर्णायक घटक ठरतो. कुटुंब, शिक्षक, मुख्याध्यापक, शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांनी समन्वयाने काम केल्यास स्थलांतरित मुलांच्या शिक्षणातील खंड कमी करता येऊ शकतो.

म्हणून स्थलांतरित मुलांसाठी "प्रवेशापासून सातत्यपूर्ण शिक्षणापर्यंत" अशी एकात्मिक शैक्षणिक व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षणाचा अधिकार हा मुलाच्या निवासस्थानाच्या स्थिरतेवर अवलंबून नसावा. हंगामी स्थलांतर हंगामी स्थलांतर करणाऱ्या प्रत्येक मुलाला स्थान,

भाषा आणि आर्थिक परिस्थिती बदलली तरी गुणवत्तापूर्ण आणि सातत्यपूर्ण शिक्षण मिळणे ही समावेशक शिक्षणव्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे

**संदर्भग्रंथ सूची**

आढाव बी . ए (2018). ऊसतोड कामगारांचे जीवन आणि समस्या .

Becker, G. S. (1964). Human Capital: A Theoretical and Empirical Analysis, with Special Reference to Education. University of Chicago Press.

Bronfenbrenner, U. (1979). The Ecology of Human Development. Harvard University Press.

Lee, E. S. (1966). A Theory of Migration. Demography, 3(1), 47–57.

Ravenstein, E. G. (1885). The Laws of Migration. Journal of the Statistical Society of London, 48(2), 167–235.

Ravenstein, E. G. (1889). The Laws of Migration. Journal